
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | रविवार, 26 एप्रिल 2026 | अंक क्र. 336 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# ग्रामीण रुग्णालयातील अत्याधुनिक विनामूल्य उपचाराचा लाभ घेण्याबाबत ग्रामीण भागामध्ये जागृती करावी : आ.सुरेश धस यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**आष्टी ( प्रतिनिधी )**

आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलिसिस सारखे दुर्धर आजारावरील अत्याधुनिक उपचार तसेच अनेक आजारांवर उपचार सुरू करण्यात आले असून शहरी भागातील खर्चिक उपचारांपेक्षा आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये विनामूल्य असलेल्या या उपचाराचा फायदा गोरगरीब रुग्णांनी घ्यावा याबाबत ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांनी जनजागृती करावी आणि आरोग्य सेवेचा सर्वात मोठा खर्च वाचवावा असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलिसिस सेंटर सोनोग्राफी मशीन चा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते

यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीश सोळंके आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.रामदास मोराळे रुग्णकल्याण समिती अशासकीय सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे, पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग आष्टी विधानसभा मतदारसंघ प्रमुख गणेश नाना शिंदे, माजी सभापती आदिनाथ सानप, पंचायत समिती सदस्य यशवंत खंडागळे उपस्थित होते..

पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की पूर्वी आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये दैनंदिन रुग्ण तपासणी ओपीडी अत्यंत कमी होती रुग्ण आल्यास त्याच्यावर थातूरमातूर उपचार करून त्यांना अहिल्यानगर येथे पाठवण्यात येत होते आता यापुढे असले गैरप्रकार होणार नाहीत त्यामुळेच डॉ.रामदास मोराळे यांच्यासारख्या अत्यंत कार्यक्षम आणि सेवाभावी वृत्ती असल्या वैद्यकीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे ग्रामीण रुग्णालयाचा कारभार सोपवला असून रुणकल्याण समितीचे सदस्यांनी देखील अत्यंत चांगले काम सुरू केले असल्याचे त्यांनी सांगत यापुढे

अत्यंत खर्चिक आणि अहिल्या नगरला जाऊन करावे लागत असलेली डायलिसिस सेवा ठिकाणी सुरू करून रुग्णांचा मनस्ताप आणि खर्च वाचणार आहे असे सांगून आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये आता दुर्बिणीद्वारे गर्भपिशवी काढणे, सिजेरियन प्रसूती, अपेंडिक्स,हर्णिया आणि मुळव्याध या शस्त्रक्रिया, महिलांसाठी आठवड्यातून एकदा सोनोग्राफी, 12 आठवड्यापर्यंत सुरक्षित गर्भपात सेवा, या सर्व सेवा तेही विनामूल्य पद्धतीने होणार असल्यामुळे गोरगरीब जनतेने याचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील सर्व कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जनजागृती व्हावी यासाठी या उपचारांविषयी फलक लावावेत असे आवाहन करून ते म्हणाले की, सध्याची दैनंदिन रुग्ण तपासणी सरासरी 250 वरून 500 पर्यंत व्हावी अशी आपली अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले



आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयाच्या सोयी सुविधांसाठी आपण सतत प्रयत्नशील असून शासन पातळीवर आपण यासाठी पाठवा करत राहू असेही त्यांनी शेवटी सांगितले यावेळी बोलताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके म्हणाले की, आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीने डॉ. रामदास मोराळे आणि त्यांचे टीम काम करत असून या रुग्णालयासाठी आवश्यक असणारे कर्मचारी आणि सर्व अडीअडचणी ची पूर्तता करण्यात येईल..

आ.सुरेश धस यांचे मतदार संघातील ग्रामीण रुग्णालयांकडे चांगले लक्ष असल्यामुळे गोरगरीब रुग्णांना चांगली सेवा मिळत आहेत असे सांगितले यावेळी बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे म्हणाले की, अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीमध्ये आपण या ग्रामीण रुग्णालयाचा पदभार घेतला असून दैनंदिन ओपीडी मध्ये वाढ झाली असून सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन यापुढे सर्व प्रकारचे अत्याधुनिक उपचार करून गोरगरीब रुग्णांची सेवा या रुग्णालयाद्वारे करण्याचा प्रयत्न आम्ही करत असून आ.सुरेश धस अण्णा यांच्या सूचनेप्रमाणे या ठिकाणी वीज आणि पाणी या सुविधा उपलब्ध झाल्या असून यापुढे आणखी चांगली सेवा देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत असे सांगितले

रुग्ण कल्याण समितीचे अशासकीय सदस्य यावेळी म्हणाले की, ग्रामीण रुग्णालय हे गोरगरीब जनतेचे आरोग्य मंदिर असून या ठिकाणी आता अत्यंत चांगले पद्धतीची सेवा सुरू झाली आहे आ.सुरेश धस यांच्या पुढील संकल्पनेतून त्यांनी येथील सर्व व्यवस्था चांगली करण्याचा प्रयत्न केला असून रुग्णांच्या सोयी सुविधेसाठी कर्मचाऱ्यांच्या सहकार्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले..

या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी प्राध्यापक सय्यद अलाउद्दीन यांनी केले यावेळी.... यांच्यासह ग्रामीण रुग्णालय सहाय्यक अधीक्षक श्री शंकर सोंडगे कनिष्ठ सहाय्यक योगेश सोनवणे परिसेविका श्रीमती बेबी शेख वैद्यकीय अधिकारी डॉक्टर बालाजी गुट्टे डॉक्टर सुरेश ढाकणे डॉक्टर चारुदत्त पवार डॉक्टर नितीन घोडके डॉक्टर भूपेंद्र पन्हाळे डॉक्टर संतोष जावळे डॉक्टर निखिल गायकवाड उपस्थित होते.

# टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार : वसंत मुंडे

**परळी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील आजी माझी कृषिमंत्र्यांनी व कृषी अधिकाऱ्यांनी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याचा पिक विम्याचा प्रश्न प्रलंबित पडल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्यांनी जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय अनेक पुराव्यासहीत लेखी तक्रारी शासनाकडे दाखल करून उच्च न्यायालयापर्यंत विविध जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात शासनाला व पिक विमा कंपन्यांना शेतकऱ्याचे पैसे त्वरित खात्यात वर्ग करण्याचे आदेश देऊनही कारवाई केली जात नाही. आर एस एस च्या विचारधारेचे केंद्रातील भाजप सरकार यांनी २०१६ पासून पिक विमा संदर्भात खाजगीकरण केले त्यामुळे शेतकऱ्याचा मोठ्या प्रमाणावर पिक विमा मिळण्यामध्ये अडथळे निर्माण झाले आहेत.

२०२० पासून आज पर्यंत खाजगी पिक विमा कंपन्याकडून कृषीचे प्रशासकीय अधिकारी आजी माजी मंत्री यांनी सर्व कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला विमा मिळत नाही. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत सर्व वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारच्या नियमावली पिके पेरणी पासून काढणी पर्यंत कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ कमी जास्त पाऊस पडल्यामुळे शेतीच्या उत्पन्नावर परिणाम होतो या सर्व नियमाचे शासनाकडून विमा कंपन्याकडून पडताळणी करून विविध जिल्हास्तरीय नियमाचे तपासणी केल्यानंतर पिक विमा संदर्भात निर्णय घेतला जातो परंतु सर्व नियमाचे उल्लंघन करण्यात ईडी व त्रिमूर्ती सरकारमधील लोक प्रतिनिधी मंत्री प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या पीक विमा योजनेअंतर्गत सरकारकडून २० ते ३५ टक्के पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. परंतु केंद्र व राज्य सरकार तसेच उच्च न्यायालयाचे आदेशाचे ही खाजगी विमा कंपन्या



पालन करीत नाहीत.

पिक विमा कंपन्यावर शासनाचे नियंत्रण नाही सर्व स्तरात पिक विमा मिळण्यास शेतकऱ्याला अडचणी निर्माण होत आहेत, तरी ही शासनाकडून पिक विमा कंपन्यावर काळया यादीत टाकण्याची कारवाई केली जात नाही. २०२५ च्या पीक विम्या संदर्भात तर अतिवृष्टीमुळे हाहाकार माजलेला होता सर्व स्तरावर पिकांची शेतकऱ्याची प्रचंड नुकसान झालेली आहे. तरी ही खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी ,लोकप्रतिनिधी, आजी माझी कृषिमंत्री कृषी आयुक्त, सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर टक्केवारी देऊन तडजोड केल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास विलंब लागणार असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला .

# राज्यात उष्णतेचा कहर; 6 जिल्ह्यांना उष्णतेचा, तर 10 जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट


**मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राचं हवामान बिघडलय आणि याचा फटका सर्वांनाच बसतो आहे. राज्यावर दुहेरी संकट आल्याचं चित्र निर्माण झालं आहे. एकीकडं भरपूर पाऊस तर एकीकडे भरपूर ऊन पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने ६ जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट आणि १० जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

## या जिल्ह्यांना आहे पावसाचा यलो अलर्ट

मुंबई, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांना हवामान विभागाने उष्णतेचा यलो अलर्ट दिला आहे. हवेतील आद्रता अधिक वाढणार असून प्रचंड उष्णता जाणवू शकते. त्यामुळे नागरिकांना डिहायड्रेशन यांसारख्या समस्या उदभवू शकतात, त्यामुळे नागरिकांनी दुपरी उन्हात जाणे टाळावे, असे हवामान विभागाने आवाहन केले आहे. तसेच कोकण, सिंधुदुर्ग, रत्नागिरीत दुहेरी वातावरण कायम राहणार असून काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे तसेच ३० ते ५० किमी तशी वेगाने वारे वाहण्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत.

विदर्भात अवकाळी पावसाचे संकट टळले असून अकोला, अमरावती आणि वर्धा या भागांमध्येही उष्णतेचा प्रभाव पुन्हा वाढणार आहे. कमाल तापमान ३८ ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत जाणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. तर किमान तापमान २५ ते २७ अंशाच्या आसपास राहील, त्यामुळे उष्माघाताचा धोका वाढण्याहची शक्यता आहे . पश्चिम महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचे संकट कायम आहे. पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, आणि सोलापूर या जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच तापमान ३२ ते २५ अंशापर्यंत राहण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगावमध्ये उष्णतेचा पारा चढला असून हवामान कोरडे राहील, कमाल तापमान ३३ -३९ अंशाच्या दरम्यान राहिल. मराठवाड्यातील परभणी,नांदेड आणि लातूर जिल्ह्यांतील पावसाचा यलो अलर्ट पुन्हा जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांत विजांसह पावसाची शक्यता असून तापमान ३३ ते ३६ सेल्सिअस दरम्यान राहू शकते. दरम्यान छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये कोणताही अलर्ट नसेल. मात्र वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम होण्याची शक्यता आहे. या भागात कमाल तापमान २३ ते २५ अंशाच्या दरम्यान राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.





# मुंबई महापालिकेच्यावतीने विद्यार्थीनींसाठी कांदिवलीत वसतीगृह

**मुंबई (वृत्तसंस्था) :**

मुंबई महापालिकेच्यावतीने गोरेगाव येथे नोकरदार महिलांसाठी वसतीगृह सुरु करण्यात आल्यानंतर आता कांदिवली आकुर्ली गाव येथे विद्यार्थीनींसाठी वसतीगृह बांधण्यात आले आहे. तळ अधिक पाच मजल्यांच्या या इमारतीत १८ वर्षांवरील विद्यार्थीनींची राहण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या प्रस्तावाला महापालिकेच्या सुधार समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या वसतिगृहाची देखभाल आणि व्यवस्थापन राखण्यासाठी जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन यां सस्थेची नेमणूक करण्यात येणार आहे.

कांदिवली पूर्व येथील आकुर्ली गाव येथे १६४२ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेवर तळ अधिक पाच मजल्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून ही इमारत महापालिकेच्या नियोजन विभागाच्या ताब्यात आल्याने आता याठिकाणी विद्यार्थीनींचे वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय घेता आहे. या वसतिगृहात १८ वर्षांवरील विद्यार्थीनींना प्रवेश दिला जाणार असून त्यांच्या निवासासाठी ४५ खोल्यांची रचना केली आहे. त्यामध्ये एकूण १३५ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे.

या मुलींचे वसतीगृह चालण्यासाठी महापालिकेच्या नियोजन विभागाच्यावतीने इच्छुक संस्थांकडून अर्ज मागवण्यात आले होते. यामध्ये चार संस्थांनी भाग घेतला होता आणि त्यामध्ये जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन या संस्थेची निवड करण्यात आली आहे. या संस्थेकडे विद्यार्थीनी वसतीगृह चालवण्याचा ११ वर्षांचा अधिकार आहे. या संस्थेच्यावतीने बेड, गाद्या, उशी, बेडशीट, चादर इत्यादी पुरवण्यात येणार आहे, याशिवाय जेवणाची सुविधा, विद्यार्थीनींना पुरवण्यात येणाऱ्या चांगल्या पोष्टिक जेवणाची काळजी घेतली जाणार आहे. या वसतीगृहातील मुलींना रोज सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण,व रात्रीचे जेवण यासाठी आवश्यक असलेले शुल्क संस्थेमार्फत आकारले जाणार आहे. वीज बिल, स्वच्छता संस्थेच्यावतीने केला जाईल आणि मालमत्ता कर महापालिकेच्यावतीने भरला जाणार आहे. सध्या या संस्थेची प्रथम ११ महिन्यांकरता नेमणूक करण्यात आली असून पुढील ११ महिन्यांकरता २० वेळा मुदतवाढ दिली जाणार आहे.



# मायेचा जिव्हाळा जपणारी गावाकडची माणसं

धावपळीच्या आयुष्यात हरवलेला माणूस जेव्हा थकून जातो, तेव्हा त्याला आठवण येते ती आपल्या गावच्या मातीची आणि तिथल्या मायेच्या सावलीची. शहर आपल्याला सोयी-सुविधा देतं, पण गाव आपल्याला 'जिव्हाळा' देते.

आजही आपल्या गावाकडच्या माणसांचा विचार केला, तर ती आजही मायेचा जिव्हाळा जपणारी आहेत, हे गावी गेल्यावरच प्रकर्षाने जाणवते. पोटापाण्याच्या आणि उदरनिर्वाहाच्या साधनांच्या अभावामुळे आपण शहरात आलो, हे वास्तव असले तरी आपले मन मात्र कायम गावाकडेच असते. शहरात राहूनही सणासुदीला ज्यांना शक्य असते, ते गावी जाऊन सण साजरा करतात आणि पुन्हा रोजीरोटीसाठी शहरात परततात. इतकेच नाही, तर मुलांची वार्षिक परीक्षा संपली की कुटुंबीयांसोबत उन्हाळ्यात दहा-पंधरा दिवस आपल्या गावी आवर्जून राहून येतात. या काळात गावच्या माणसांच्या सहवासात राहिल्यावर समजते की, ही माणसे आजही आपली परंपरा आणि निसर्गाशी नाते जपून आहेत.

गावची माणसे अत्यंत कष्टाळू असतात. भावकीत कितीही गट-तट असले तरी संकटाच्या वेळी हीच माणसे सावलीसारखी पाठीशी उभी राहतात. वरून फणसासारखी काटेरी वाटली, तरी ही माणसे आतून गऱ्यासारखी गोड असतात. ही माणसे आपल्या मातीशी प्रामाणिक असतात. आपापसात भांडणे झाली, तरी सुख-दुःखाच्या प्रसंगी ती एकत्र येतात. काबाडकष्ट करून घरी आलेल्या पाहुण्याला ती 'काय देऊ?' असे शहरातल्या लोकांसारखे विचारत नाहीत, तर घरात जे काही असेल ते आनंदाने समोर ठेवतात. घरात साखर नसली तरी मागच्या दाराने शेजाऱ्याकडून ती आणून पाहुण्याला चहा देतील, पण त्याला त्याची जाणीवही होऊ देणार नाहीत. कितीही संकटे आली तरी शहरातील नातेवाइकांना न कळवता आहे त्यात समाधान मानणारा हा गावचा माणूस आहे.

कोविड काळात या माणसांना १४ दिवस घरापासून दूर राहावे लागले, याची सल आजही त्यांच्या मनात आहे. मध्यंतरी गॅस आल्याने चुलीकडे दुर्लक्ष झाले होते, मात्र आता गॅसच्या वाढत्या किमतींमुळे पुन्हा चुलीला चांगले दिवस आले आहेत. याचे श्रेय गावच्या माणसांनाच जाते, कारण त्यांनी चुलीचे अस्तित्व टिकवून ठेवले. आजही कोकणात येणारे पर्यटक चुलीवरच्या जेवणालाच जास्त पसंती देतात.

आता चातक पक्ष्याप्रमाणे गावची माणसे चाकरमान्यांची आणि त्यांच्या मुलाबाळांची वाट पाहत आहेत. पूर्वी पत्र आल्यावर चाकरमानी येणार हे समजायचे आणि गावची मंडळी त्यांच्या स्वागतासाठी सज्ज व्हायची. घरापुढचे अंगण सारवून रांगोळ्या काढणे, वाट साफ करणे, घर नीटनेटके ठेवणे ही कामे हौसेने केली जायची. स्वतःच्या झाडाला आंबे-फणस नसले तरी शेजाऱ्या-पाजाऱ्यांकडून ते मिळवून पाहुण्यांची सोय केली जायची. गावी आल्यावर दुसऱ्याच दिवशी फणसाची सुकी भाजी (जनता भाजी) पोटभर खिलवली जाते. चाकरमान्यांनी रानावनात जाऊ नये, त्यांनी वर्षभर शहरात कष्ट केले आहेत म्हणून त्यांनी घरीच आराम करावा, असा वडिलकीचा सल्ला ही माणसे देतात. "पोरांना सांभाळा, काट्याकुट्यात पाठवू नका, बाहेरचे पाणी पिऊ नका, चुलीवर गरम केलेलेच पाणी प्या" असे प्रेमळ सल्ले तिथे मिळतात.

पुन्हा शहरात परतीच्या प्रवासाला निघताना सुकी मासळी कपड्याच्या पिशवीत बांधून द्यायला ही माणसे विसरत नाहीत. त्यासाठी गावात येणाऱ्या मासेवालीला आधीच सांगून ठेवले जाते. त्यासोबतच एखाद-दोन किलो घरचे तांदूळ न सांगता पिशवीत भरले जातात. हे सर्व केवळ मायेपोटी केले जाते. शहराच्या धकाधकीच्या जीवनापेक्षा गावच्या जीवनात नात्यांचा ओलावा जास्त असतो. शेजाऱ्याकडे पाहुणे आले तरी त्यांची विचारपूस करणारी ही माणसे आजही एकत्र कुटुंब पद्धती टिकवून आहेत.

आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हे त्यांचे सूत्र असते. सार्वजनिक कामासाठी ही मंडळी मतभेद विसरून एकत्र येतात. सणादिवशी एकमेकांना गोडधोड वाटतात. ताटातले जेवण शेजाऱ्याला नेऊन देण्याची संस्कृती आजही तिथे जिवंत आहे. जेव्हा चाकरमानी पुन्हा शहरात जाण्यासाठी निघतात, तेव्हा त्यांचे सामान उचलण्यापासून त्यांना गाडीपर्यंत सोडायला जाण्यापर्यंत ही माणसे सोबत असतात. "पुढच्या वर्षी नक्की या, पोरांना सांभाळा, पोहोचल्यावर फोन करा," असे सांगताना त्यांच्या डोळ्यांत पाणी येते. कारण, ही केवळ माणसे नसून मायेचा आणि प्रेमाचा ठेवा जपणारी माणुसकीची प्रतीके आहेत. अशी ही मायेचा जिव्हाळा जपणारी गावाकडची माणसं आजही माणुसकी जिवंत ठेवून आहेत.



# ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामामुळे बीडमध्ये सकारात्मक परिवर्तन!

## अंजली व अनिश दमानिया यांचा दोन दिवशीय कृषीकुल दौऱ्यात प्रभावी सुसंवाद; माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट; शेती - मातीच्या विषयावर सखोल चर्चा

**सिरसाळा (अतुल बडे)**

कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. २०१२ साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, "त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो."

त्या पुढे म्हणाल्या की, २०१६ पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या "कृषीकुल" प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या दोन दिवसीय भेटीत अंजली दमानिया आणि त्यांचे पती अनिश दमानिया यांनी विविध उपक्रमांची सखोल पाहणी केली. डेमो प्लॉट्स, माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण प्रयोगशाळा, पीक संरक्षण प्रयोगशाळा, सेंद्रिय शेती प्रयोग आणि बायोगॅस संयंत्र यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेत संवाद साधला. यावेळी संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, "देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या ध्येयाने आम्ही काम करत आहोत. हजारो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. मात्र अजूनही अनेक अडचणी आहेत, शेतीसाठी आवश्यक रस्त्यांची कमतरता, प्रशासनाचे अपुरे सहकार्य आणि सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे गंभीर आहेत." या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी या कामात सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अनिश दमानिया, जे महाराष्ट्र शासनाच्या धोरणनिर्मिती संस्थेतील "मित्रा"चे सचिव आहेत, यांनी सांगितले की, "ग्लोबल विकास ट्रस्टमुळे हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या संस्था अत्यंत कमी आहेत. या कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात व्यापक परिवर्तन घडवण्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू." तसेच शासनाच्या लोककल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ट्रस्टसोबत समन्वयाने काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या दौऱ्यादरम्यान बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी तथा माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनीही कृषीकुलची पाहणी करून उपक्रमांची माहिती घेतली आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाचे कौतुक केले. एकूणच, बीड जिल्ह्यातील बदलाची ही कहाणी केवळ प्रकल्पांची नाही, तर शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर उभ्या राहिलेल्या ग्रामीण पुनरुत्थानाची आहे—आणि त्यात कृषीकुलसारख्या उपक्रमांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले.

केवळ बिड जिल्यातील नव्हे तर राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था काम करत आहे. जलनायक मयंक गांधी आणि संजय परमार यांच्या प्रयत्नातून संस्थेचा विस्तार झपाट्याने वाढत असल्याचा मला मनस्वी आनंद असून, आगामी काळात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सर्व पातळीवर काम करणार असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बोलताना सांगितले.

# टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशिन लर्निंग आणि इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्यूनिकेशन इंजिनिअरींग या दोन अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद दिल्ली (एआयसीटीई) यांची मान्यता

## प्रवेश घेण्यासाठी टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकला विद्यार्थ्यांचे प्रथम प्राधान्य

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलित, टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मध्ये, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशिन लर्निंग (६० जागा) व इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्यूनिकेशन इंजिनिअरींग (६० जागा) या दोन अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, दिल्ली (एआयसीटीई) यांची मान्यता मिळाली आहे. अशी माहिती कॅम्पस डायरेक्टर डॉ.बी.आय.खडकभावी यांनी दिली. पुर्वीप्रमाणेच प्रवेश घेण्यासाठी टी.बी. गिरवलकर पॉलिटेक्निकला विद्यार्थ्यांचे प्रथम प्राधान्य मिळत असून विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे.

या दोन नविन अभ्यासक्रमामुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या अभ्यासक्रमात डिप्लोमा इंजिनिअरींग होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक हे मागील ४३ वर्षांपासून विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचे धडे देणारे नावाजलेले पॉलिटेक्निक म्हणून ओळखले जाते. या महाविद्यालयात पूर्वीपासूनच कॉम्प्यूटर इंजि., इलेक्ट्रीकल इंजि., मेकॅनिकल इंजि., सिव्हील इंजिनियरींग हे अभ्यासक्रम चालवले जातात. दोन नविन अभ्यासक्रमांमुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या अभ्यासक्रमात डिप्लोमा इंजिनिअरींग होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. या अभ्यासक्रमात शिक्षण घेऊन या महाविद्यालयाचे विद्यार्थी देशविदेशात अनेक पदांवर कार्यरत आहेत. या पॉलिटेक्निक मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये झालेल्या महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, बजाज, धुत ट्रान्समिशन, विप्रो, महापारेशन, टीसीएस, इन्फोसिस, महावितरण, जॉन डीअर, लार्सन ॲण्ड ट्युब्रो, हंसा प्लेक्स या नांमांकीत कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीमध्ये १०० टक्के विद्यार्थ्यांची निवड होवून आकर्षक पगारावर काम करण्याची संधी मिळाली आहे. तसेच इंटर्नशिप करीता विद्यार्थ्यांची निवड होऊन या नामांकीत कंपन्यांमध्ये आकर्षक मानधनावर कामाचा अनुभव मिळवून भविष्यात चांगल्या नोकरीची संधी उपलब्ध होण्याची संधी मिळाली आहे. आय.डी.एस.एस.ए.अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी पारितोषिक संपादन केले. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये क्रीडा स्पर्धा, शिवजयंती उत्सव-२०२६, वृक्षारोपण, मुलींसाठी आत्मभान शिबीर, प्रकल्प स्पर्धा, अर्थसाक्षरतेचे महत्व अशा विविध उपक्रमात विद्यार्थी उत्स्फूर्त सहभाग नोंदवतात. उन्हाळी व हिवाळी परीक्षेत या पॉलिटेक्निकचा निकाल सतत उंचावत आहे. या वर्षी हिवाळी परीक्षा २०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या गुणवत्ताधारक शिष्यवृत्ती करीता १७ विद्यार्थी पात्र ठरले. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जातो. देश, विदेशात या पॉलिटेक्निकचे विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. त्या माजी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या कामाचा. अनुभव व मार्गदर्शन सध्या शिक्षण घेत असलेल्या पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना होत आहे. हेच विद्यार्थी देशाचे व महाविद्यालयाचे नांव उज्वल करत आहेत. महाविद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ बसवंतराव सांगवे, उपाध्यक्ष माधवराव त्रिंबकराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव हणमंतराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल सिद्रामप्पा मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप विश्वनाथप्पा दिंडीगावे, सर्व संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व मार्गदर्शक डॉ.बी.आय.खडकभावी, कार्यवाहक प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावले यांनी अभिनंदन केले. टी.बी. गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्हि.बगले, सर्व विभागप्रमुख आणि कर्मचारीवर्ग यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत त्यांच्या सर्वांगिण विकासावर सुधारणा घडवून आणत आहेत.

## लोकार्थ

### ]जेसीबी इंडियाकडून पीएमजीएस-वाय-III मुदतवाढीचे स्वागत




भारत सरकारने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (पीएमजीएसवाय-III) मार्च २०२८ पर्यंत वाढवण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे जेसीबी इंडियाने स्वागत आणि कौतुक केले आहे. सरकारचा हा निर्णय ग्रामीण कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत करण्याप्रती असलेल्या देशाच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करतो. गावांना आवश्यक सेवा आणि विकास केंद्रांशी जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्ते मार्गांमध्ये सुधारणा करून ही मुदतवाढ दैनंदिन दळणवळण सुलभ करण्यास मदत करेल. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था दृढ होईल आणि ग्रामीण समुदायांना प्रगती व उत्तम जीवनमान देणाऱ्या संधींच्या जवळ आणले जाईल.हा उपक्रम सर्वसामान्यांच्या हितासाठी आहे. उत्तम रस्ते म्हणजे, हॉस्पिटल्स आणि विशेष वैद्यकीय उपचारांपर्यंत जलद पोहोचणे, शेतीमालाची सुरळीत वाहतूक आणि शिक्षण व रोजगार केंद्रांपर्यंत सहज प्रवेश मिळणे. शेतकऱ्यांसाठी हा उपक्रम विलंब आणि नुकसान कमी करतो, तर कुटुंबांना वेळेवर वैद्यकीय मदत आणि विनाव्यत्यय शिक्षण मिळू शकते. जेसीबीचा विश्वास आहे की, ग्रामीण पायाभूत सुविधांमधील अशा केंद्रित गुंतवणुकीचा कायमस्वरूपी सामाजिक आणि आर्थिक प्रभाव पडेल. यामुळे गावे सक्षम होतील.

### एअरटेलचा महाराष्ट्र आणि गोव्यात 5G नेटवर्क साइट्सचा विस्तार

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदाता कंपन्यांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने घोषणा केली की, महाराष्ट्र आणि गोव्यात 3,400 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारण्यात आल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांना अधिक वेगवान इंटरनेट, व्यापक कव्हरेज आणि सुधारित नेटवर्क अनुभव मिळत आहे. हा नेटवर्क विस्तार मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्र आणि गोव्याच्या सर्व 36 जिल्ह्यांमध्ये करण्यात आला आहे, ज्यामुळे शहरी केंद्रे, वेगाने विकसित होणारी शहरे आणि दुर्गम गावांमध्ये राहणाऱ्या 2.2 कोटीहून अधिक ग्राहकांचा समावेश झाला आहे. यामुळे गडचिरोली, नंदुरबार आणि सिंधुदुर्ग यांसारख्या उदयोन्मुख आणि विकासशील जिल्ह्यांतील ग्राहकांना विशेष फायदा होत आहे, जिथे नवीन साइट्सद्वारे कनेक्टिव्हिटीतील तूट भरून काढली जात आहे, डिजिटल समावेशनाला चालना मिळत आहे आणि विश्वासार्ह इंटरनेट सेवा सुनिश्चित केली जात आहे.

दररोज 9 पेक्षा अधिक नवीन साइट्स सक्रिय होत असल्यामुळे, महाराष्ट्र आणि गोव्यातील विविध जिल्ह्यांतील ग्राहक आता ते कुठेही राहत असले किंवा प्रवास करत असले, तरीही कोणत्याही अडथळ्यांशिवाय स्ट्रीमिंग, जलद डाउनलोड, ऑनलाइन काम व शिक्षण, तसेच अधिक विश्वासार्ह डिजिटल पेमेंटचा अनुभव घेऊ शकतात.

### वर्ल्ड ट्रेड सेंटरकृत त्रिनिदाद आणि टोबॅगो संवादात्मक बैठक

वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजच्या सहकार्याने, त्रिनिदाद आणि टोबॅगो येथील उच्चस्तरीय व्यावसायिक शिष्टमंडळासोबत एका संवादात्मक बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत, भारत आणि कॅरिबियन बाजारपेठांमध्ये व्यापक संधी मिळवण्यासाठी द्विपक्षीय सामर्थ्याचा विस्तार कसा करता येईल, यावर प्रकाश टाकण्यात आला.डब्ल्यूटीसी मुंबईचे अध्यक्ष आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष, डॉ. विजय कलंत्री यांनी यावर जोर दिला की, त्रिनिदाद आणि टोबॅगो हे कॅरिबियन प्रदेशासाठी एक मोक्याचे प्रवेशद्वार आहे. ते म्हणाले, "दोन्ही बाजूंनी आपल्याला घरच्यासारखे वाटते आणि या समान सौहार्दाचे रूपांतर अधिक मजबूत व्यापारी संबंधांमध्ये झाले पाहिजे. त्रिनिदाद आणि टोबॅगोची बलस्थाने कॅरिबियन अर्थव्यवस्थांमध्ये विस्तारता येतील, ज्यामुळे भारतीय उद्योगांसाठी गुणात्मक परिणाम निर्माण होईल. त्याच वेळी, त्रिनिदाद आणि टोबॅगो कॅरिबियनमधील एक प्रमुख एलएनजी आणि पेट्रोकेमिकल निर्यातदार म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, ज्यात भारताच्या ऊर्जा विविधीकरणात योगदान देण्याची आणि द्विपक्षीय व्यापारी संबंधांची लवचिकता मजबूत करण्याची प्रबळ क्षमता आहेभारत आणि त्रिनिदाद आणि टोबॅगो यांच्यातील द्विपक्षीय व्यापार, जो सध्या अंदाजे ३४० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आहे,




L-R: Mrs. Nidhi Saxena, General Manager - Business Development, BLS International, Mrs. Charu Khosla, Chief Operating Officer - Strategic Markets, Governments and Institutions, BLS International & Dr. Waiel S. H. Awwad, Secretary General (In-charge) of IACCIA

### बीएलएस इंटरनॅशनलचा आयएसी-सीआयएसोबत सामंजस्य करार

बीएलएस इंटरनॅशनल या सरकार व नागरिकांसाठी एआय आणि तंत्रज्ञान-सक्षम सेवा पुरवणाऱ्या आघाडीच्या जागतिक सहयोगीने इंडिया अँड अरब कंट्रीज चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (आयएसीसीआयए) सोबत धोरणात्मक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या करारानुसार, बीएलएस इंटरनॅशनल भारतातील त्यांच्या १७ केंद्रांच्या नेटवर्कद्वारे व्यावसायिक प्रमाणीकरण आणि संबंधित सेवांचा विस्तार करणार आहे. या सहयोगामुळे २२ अरब लीग देशांशी व्यापार करणाऱ्या भारतातील व्यावसायिकांसाठी कागदपत्रांची प्रक्रिया अधिक वेगवान, सुलभ आणि अत्यंत कार्यक्षम होईल. आयएसीसीआयएचे सरचिटणीस (प्रभारी) डॉ. वाईल एस. एच. अव्वाद आणि बीएलएस इंटरनॅशनलच्या स्ट्रॅटेजिक मार्केट्स, गव्हर्नमेंट्स व इन्स्टिट्यूशन्सच्या चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्रीमती चारू खोसला यांच्या उपस्थितीत हा सामंजस्य करार औपचारिकरित्या पूर्ण करण्यात आला.इंडिया अँड अरब कंट्रीज चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर (आयएसीसीआयए)ला नुकतेच भारत सरकारच्या परकीय व्यापार महासंचालनालयाकडून (डीजीएफटी) अधिकृत मान्यता मिळाली आहे. या मान्यतेमुळे आयएसीसीआयएला आता नॉन-प्रिफरेंशियल सर्टिफिकेट ऑफ ओरिजिन जारी करण्याचे आणि व्यावसायिक कागदपत्रांचे प्रमाणीकरण करण्याचे अधिकार मिळाले आहेत.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# शिक्षण क्षेत्रामध्ये सामाजिक बांधिलकी महत्त्वाची : बाळासाहेब नायकवडी

## भाटवडेत सुनिता धुमाळ यांचा सेवापूर्ती समारंभ उत्साहात



**भाटवडे |** शिक्षण क्षेत्रामध्ये सामाजिक बांधिलकी म्हणून काम करणे महत्त्वाचे आहे. शिक्षणाचे खाजगीकरण होत असताना या क्षेत्रातील अनेक नव्या आव्हानांना आपणास सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत शिक्षकी पेशावर अढळ निष्ठा ठेवून शिक्षकांनी कार्यरत राहावे, असे आवाहन शिराळा पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब नायकवडी यांनी केले.

भाटवडे येथे जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षिका सुनिता धुमाळ यांच्या सेवापूर्ती समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शेतकरी विणकरी सूतगिरणीचे संचालक हरिश्चंद्र औताडे होते. यावेळी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार मानसिंगराव नाईक प्रमुख उपस्थित होते. यावेळी नायकवडी पुढे म्हणाले, सुनिता धुमाळ यांचे काम अंधारात दिवा लावण्यासारखे आहे. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या नवोदित शिक्षकांना त्यांनी एक आदर्श पायंडा घालून दिला आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीचे त्यांनी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

यावेळी हरिश्चंद्र औताडे, किरण उथळे, सौ. छाया माळी, दीपक रोकडे, वसंत शिंगारे, अनिता काटे, विलास कदम यांची भाषणे झाली. यावेळी रयत क्रांती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष किरण उथळे, ग्यानप्रकाश फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक अजय पाडळे, गटशिक्षणाधिकारी सुनील आंबी, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. छाया माळी, केंद्रप्रमुख राजेंद्र पाटील, वसंत शिंगारे, सरपंच नेताजी चव्हाण, उपसरपंच अमोल देवकर, जागर शिक्षणाचा प्रणेते दीपक रोकडे, शिक्षक नेते राजकुमार पाटील, किसन पाटील, रमेश पाटील, उत्तम पाटील, अनिल रोकडे, संजय सावंत, सुरेश देवकर, जगन्नाथ माने, हौसेराव उथळे, कृष्णदेव जाधव, सौ.अश्विनी जाधव, रमेश बल्लाळ, नितीन धुमाळ, चेतन धुमाळ, अमर थोरात, लालासो धुमाळ, प्रशांत माने उपस्थित होते.

प्रास्ताविक माणिक पाटील यांनी केले. आभार सुहास पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन विनोद सावंत आणि सुप्रिया घोरपडे यांनी केले.

# निदेशकपदी नियुक्तीबद्दल शुभम फुटके यांचा तेलु युवक संघटनेच्या वतीने सत्कार



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात निदेशक पदी नियुक्ती झाल्याबद्दल शुभम शांतलिंगआप्पा फुटके यांचा येथील तेली युवक संघटनेच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शुभम फुटके यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी मिळवलेले हे यश परिसरासाठी अभिमानास्पद असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. त्यांच्या नियुक्तीमुळे विभागाच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. सत्कार समारंभात पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तेली युवक संघटनेचे तालुकाध्यक्ष पवन संगमेश्वर फुटके, राहुल क्षीरसागर,रवी अन्नपुर्णे,शंकर कौले, सुनील क्षीरसागर, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे,दिपक क्षीरसागर, सुजित पिंपळे आदि युवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बौद्धिक संपदा : नवसर्जनाचे संरक्षक छत्र

**दरवर्षी २६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक बौद्धिक संपदा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि हा दिवस मानवी सर्जनशीलतेच्या सामर्थ्याचा, ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेचा आणि नवोन्मेषाच्या प्रवाहाचा उत्सव म्हणून ओळखला जातो. मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला असता असे स्पष्टपणे दिसून येते की, मानवाने आपल्या बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या आणि सर्जनशीलतेच्या बळावरच समाज, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उभारणी केली आहे. या सर्व प्रक्रियेतून निर्माण होणारी बौद्धिक संपदा ही केवळ एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या प्रगतीची पायाभूत शक्ती आहे. त्यामुळे या संपदेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करणे ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची गरज ठरते. 'बौद्धिक संपदा' ही संकल्पना मूलतः मानवी बुद्धिमत्तेने साकारलेल्या निर्मितींशी संबंधित आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक शोध, औद्योगिक डिझाईन्स, व्यापारचिन्हे, भौगोलिक संकेत अशा विविध स्वरूपांमध्ये बौद्धिक संपदेचे अस्तित्व आढळते. या सर्व निर्मितींमध्ये सर्जनशीलता, मौलिकता आणि नवोन्मेष यांचे दर्शन घडते. या निर्मितींचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आले आहेत. कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत हे त्यातील प्रमुख प्रकार होत. या हक्कांमुळे सर्जकाला त्याच्या निर्मितीवर विशिष्ट कालावधीसाठी मालकी हक्क प्राप्त होतो आणि त्यातून आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्याची संधी उपलब्ध होते.**



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)

जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट केवळ या संकल्पनेची माहिती देणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर सर्जनशीलतेचा सन्मान करणे, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे आणि निर्मात्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हेही त्यामागील महत्त्वाचे हेतू आहेत. या दिवसाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगसंस्था आणि शासन यांच्याद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि सामान्य नागरिकांना बौद्धिक संपदेचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विशेषतः तरुण पिढीमध्ये नवकल्पनांची प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करणे ही या उपक्रमांची मुख्य उद्दिष्टे असतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात बौद्धिक संपदेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनोतंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये सतत नवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून निर्माण होणाऱ्या नवकल्पना आणि शोध यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची आवश्यकता अनिवार्य ठरते. एखाद्या संशोधकाने अथवा संस्थेने मोठ्या परिश्रमाने आणि गुंतवणुकीने तयार केलेल्या शोधाचे संरक्षण नसेल, तर त्या शोधाचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते आणि त्यामुळे संशोधनाची प्रेरणा कमी होऊ शकते. म्हणूनच बौद्धिक संपदा हक्क हे नवोन्मेषासाठी प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे साधन मानले जाते.

आर्थिक दृष्टीकोनातून पाहता, बौद्धिक संपदा ही आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ज्ञानाधारित उद्योगांमध्ये बौद्धिक संपदेचे मूल्य प्रचंड असते. सॉफ्टवेअर उद्योग, मनोरंजन क्षेत्र, औषधनिर्मिती उद्योग, फॅशन उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे आणि सेवांचे मूल्य त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि नवोन्मेषावर अवलंबून असते. त्यामुळे या क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.

सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही बौद्धिक संपदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक समाजाची एक वेगळी सांस्कृतिक ओळख असते आणि ही ओळख त्या समाजाच्या परंपरा, कला, साहित्य, लोकसंस्कृती यांमध्ये प्रतिबिंबित होते. या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे हे देखील बौद्धिक संपदा व्यवस्थेचे एक महत्त्वाचे कार्य आहे. विशेषतः भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील उत्पादनांची ओळख जपली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या प्रदेशातील हस्तकला, खाद्यपदार्थ किंवा कृषी उत्पादने यांना त्यांच्या विशिष्ट वैशिष्ट्यांमुळे विशेष दर्जा प्राप्त होतो आणि त्याचे संरक्षण केले जाते. यामुळे त्या प्रदेशातील कारागीर, शेतकरी आणि उत्पादक यांना आर्थिक लाभ मिळतो आणि त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे जतन होते.

तथापि, बौद्धिक संपदा हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषतः डिजिटल युगात माहितीचे आदानप्रदान अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून साहित्य, संगीत, चित्रपट, सॉफ्टवेअर यांची सहज देवाणघेवाण होत असल्यामुळे कॉपीराइट उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पायरेटसी, नकली उत्पादने, ट्रेडमार्कचे उल्लंघन या समस्या आज जागतिक स्तरावर गंभीर बनल्या आहेत. या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे.

भारतातील संदर्भात बौद्धिक संपदेचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित होते. भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि विविधतेने नटलेला देश आहे. येथे प्राचीन काळापासून विविध प्रकारचे पारंपरिक ज्ञान आणि कौशल्य विकसित झाले आहे. आयुर्वेद, योग, पारंपरिक औषधपद्धती, हस्तकला, लोककला, कृषी पद्धती या क्षेत्रांमध्ये भारताची समृद्ध परंपरा आहे. या पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण करणे आणि त्याचा योग्य उपयोग करणे ही आजची गरज आहे. भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून या परंपरांचे संरक्षण केले जाऊ शकते आणि त्यातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते.

शैक्षणिक क्षेत्रात बौद्धिक संपदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन आणि विकास यांना प्रोत्साहन देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि नवोन्मेषाची वृत्ती विकसित होते. तसेच, संशोधनातून निर्माण होणाऱ्या निष्कर्षांचे संरक्षण करून त्यांचा समाजहितासाठी उपयोग केला जाऊ शकतो. विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत पेटंट्स, कॉपीराइट्स आणि इतर बौद्धिक संपदा हक्क मिळवण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

नैतिक दृष्टिकोनातून पाहता, बौद्धिक संपदेचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या श्रमांचे आणि सर्जनशीलतेचे योग्य मूल्यांकन करणे हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. जेव्हा आपण इतरांच्या निर्मितीचा विनापरवानगी वापर करतो, तेव्हा आपण त्या व्यक्तीच्या अधिकारांचे उल्लंघन करतो. त्यामुळे बौद्धिक संपदेबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ही जाणीव वाढवता येऊ शकते.

डिजिटल युगात बौद्धिक संपदेच्या स्वरूपात मोठे बदल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारच्या सर्जनशीलतेचा उदय होत आहे. या नव्या परिस्थितीत बौद्धिक संपदा हक्कांच्या व्याख्या आणि अंमलबजावणी यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या कलाकृतींचे हक्क कोणाला द्यायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.

भारत सरकारने बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात विविध धोरणे आणि योजना राबविल्या आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधनाला चालना देण्यासाठी आणि नवोन्मेषाला समर्थन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया' यांसारख्या उपक्रमांमुळे तरुण उद्योजकांना संधी उपलब्ध होत आहे. यामुळे देशात नवकल्पनांचे वातावरण निर्माण होत आहे आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

तथापि, बौद्धिक संपदा हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अजूनही अनेक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. विशेषतः ग्रामीण भागात आणि लघुउद्योगांमध्ये या हक्कांबाबत जागरूकता कमी आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच, न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे, तक्रारींचे जलद निवारण करणे आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

जागतिक बौद्धिक संपदा दिन हा सर्जनशीलतेचा, नवोन्मेषाचा आणि ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या समाजात बौद्धिक संपदेचा आदर करण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. सर्जकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नवकल्पनांना चालना देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

अखेर, बौद्धिक संपदा ही मानवाच्या प्रगतीचा मूलाधार आहे. तिचे संरक्षण आणि संवर्धन केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे जागतिक बौद्धिक संपदा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सर्जनशीलतेचा सन्मान करण्याचा, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच या दिवसाची खरी उपयुक्तता आणि महत्ता आहे.

---

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, रविवार, 26 एप्रिल 2026

# जनगणना-२०२७ : १ मे पासून सुरू होणाऱ्या जनगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे - नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी









**परळी वैजनाथः प्रतिनिधी**

देशाच्या नियोजनाचा मुख्य आधार असलेली 'जनगणना-२०२७' सुरू होत आहे.१ मे पासून सुरू होणाऱ्या जनगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

जनगणना- २०२७ च्या अनुषंगाने परळी वैजनाथ येथे तीन दिवसाचे पहिल्या बॅचचे प्रशिक्षण डॉ. भालचंद्र वाचनालय या ठिकाणी घेण्यात आले. जनगणना प्रगणक, व पर्यवेक्षकांच्या या प्रशिक्षणाचा समारोप झाला. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रशिक्षणार्थी प्रगनक व पर्यवेक्षकांशी संवाद साधत त्यांनी जनगणना २०२७ मध्ये नागरिकांनी उस्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.यावेळी नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे यांच्यासह या प्रशिक्षणाचे प्रशिक्षक व जनगणना प्रगनक, पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की, जनगणना-२०२७'प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणून नागरिकांना १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वतःची माहिती स्वतः भरण्यासाठी 'स्व-गणना' हा विशेष पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. जनगणनेचे काम दोन टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यात 'मकान सूचीकरण आणि घरांची गणना' ही प्रक्रिया १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे. डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत होणारी ही १६ वी जनगणना असून, नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

## अंबाजोगाईत वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ट्रक चालकावर व व्यापाऱ्यांवर पोलीस निरिक्षक शरद जोगदंड यांची कार्यवाही

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

शहरातील मोंढा मार्केट परिसरात मुख्य रस्त्यावर ट्रक उभा करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.४५ ते १०.५५ वाजण्याच्या सुमारास मोंढा मार्केटजवळ (सतीश सर्विस पॉईंट समोर) यशवंतराव चव्हाण चौकाकडून येणाऱ्या मुख्य सार्वजनिक रस्त्यावर आरोपी तानाजी शेषेराव सूर्यवंशी (वय २८, रा. सावणगिरा, ता. निलंगा, जि. लातूर) याने त्याच्या ताब्यातील MH24 AU 7741 क्रमांकाचा मालवाहू ट्रक रस्त्यामध्ये उभा केला होता. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या प्रकरणी पोलीस अंमलदार बाळासाहेब ज्ञानोबा पारवे (पो.स्टे. अंबाजोगाई शहर) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक १५२/२०२६ अन्वये कलम २८५ बी.एन.एस. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, संबंधित ट्रक पोलिसांनी जप्त करून पोलीस ठाण्यात जमा केला असून, पुढील कायदेशीर कारवाई करून तो परत ताब्यात देण्यात आला आहे.



अंबाजोगाई शहर पोलिसांनी जारी केलेल्या जाहीर आवाहनानुसार, रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकणे, पिण्याच्या पाण्याच्या जारच्या गाड्या उभ्या करणे किंवा विक्रीचे गाडे लावून रस्ता अडवणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार आहे. मागील तीन महिन्यांत अशा प्रकारचे १० गुन्हे दाखल करण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची वाहने किंवा साहित्य जप्त करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे

पोलीस प्रशासनाने व्यापाऱ्यांना आवाहन केले आहे की, मालाची चढ-उतार करताना रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच गर्दीच्या वेळेत लोडिंग- अनलोडिंग टाळावे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## आष्टी येथील 'सीताई' हॉटेलच्या कट्ट्यावर रंगल्या गप्पा; विविध क्षेत्रांतील मान्यवरांची चहापानाच्या निमित्ताने मांदियाळी



**आष्टी |** आष्टी शहरातील प्रसिद्ध असलेल्या 'सीताई' हॉटेलच्या कट्ट्यावर नुकतीच विविध क्षेत्रांतील दिग्गजांची चहापानाच्या निमित्ताने अनोखी मैफल रंगली. या अनौपचारिक गाठीभेटीमध्ये सामाजिक, राजकीय आणि परिसरातील विविध विषयांवर मनमोकळ्या गप्पागोष्टी झाल्या. दैनंदिन कामाच्या व्यापातून वेळ काढत एकत्र आलेल्या या मान्यवरांच्या उपस्थितीने हा कट्टा चांगलाच गजबजून गेला होता.यावेळी चहाच्या आस्वादा सोबतच रंगलेल्या गप्पांच्या फडात प्रामुख्याने प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. बाबुराव अनारसे, इंजि.पी.बी. बोडखे, सरपंच परिवंत गायकवाड, चेअरमन अरुण सायकड, महेश साखर कारखान्याचे संचालक सदाभाऊ दिंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच,सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी या चर्चेत सहभाग नोंदवला. यात सावता परिषदेचे मराठवाडा संघटक संदीप अस्वर, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक हजारे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब वाघुले, उपसरपंच शिदू हजारे, पत्रकार अक्षय विधाते यांच्यासह दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे हेदेखील सहभागी झाले होते.

हॉटेलच्या कट्ट्यावर रंगलेल्या या बैठकीत स्थानिक विकासाचे मुद्दे,सामाजिक सलोखा आणि चालू घडामोडींवर अभ्यासपूर्ण व वैचारिक देवाणघेवाण झाली. राजकारण, समाजकारण, आणि सहकार क्षेत्रातील दिग्गज एकाच वेळी एकत्र आल्याने या अनौपचारिक गाठीभेटीची शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे.

## पारदर्शक कारभाराचे आणखी एक पाऊल: परळी नगर परिषदेचे ठराव आता एका क्लिकवर

### सभेचा इतिवृतांत ऑनलाईन टाकणारी परळी वैजनाथ नगर परिषद ठरली पहिली ; महा युएलबी पोर्टलवर ऑनलाईन सुविधा उपलब्ध

नगरपरिषद परळी वैजनाथ
नगरहितं मम कर्तव्यम्
स्थापना १९५२

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगर परिषदेच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी आता एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नगर परिषदेच्या विविध सभांमध्ये मंजूर होणारे ठराव आता सर्व सन्माननीय नगरसेवक आणि नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत महा यु एल बी ( MahaULB) या संकेत स्थळावर ऑनलाईन पाहता येणार आहेत. यापूर्वी नगर परिषदेचे ठराव पाहण्यासाठी किंवा त्याची माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत होत्या. मात्र, आता डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत ही सर्व माहिती सार्वजनिक करण्यात आली आहे. अधिकृत संकेतस्थळावर इतिवृत्त प्रकाशित करणारी परळी वैजनाथ नगरपरिषद ही पहिली नगरपरिषद ठरली आहे.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्ष खैसर राजा खा पठाण, कार्यालयीन अधीक्षक संतोष रोडे, संगणक अभियंता लक्ष्मीकांत देशमुख, सभा व्यवस्थापन प्रमुख सत्यजित पिटके, सहाय्यक विक्रम स्वामी आदींनी या अधिकृत पोर्टलवर वेळोवेळी ऑनलाईन इतिवृत्त प्रसिद्ध व्हावे यासाठी आवश्यक ती संपूर्ण तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यामुळे आता नगर परिषद सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीचे इतिवृत्त ऑनलाइन प्रसिद्ध होणार आहे. या माध्यमातून कामकाजात पारदर्शकता आणली गेली आहे.आता घरबसल्या नगर परिषदेचे निर्णय नागरिकांना पाहता येणार आहेत. सर्व ठराव आता कायमस्वरूपी ऑनलाईन स्वरूपात जतन केले जाणार आहेत.नगर परिषदेच्या या निर्णयामुळे शहरात होणारी विकासकामे, मंजूर निधी आणि प्रशासकीय निर्णय यांची माहिती पारदर्शकपणे जनतेसमोर येणार आहे. परळी वैजनाथ नगर परिषदेच्या कामकाजातील ऑनलाईन इतिवृत्तांमध्ये प्रामुख्याने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेली सर्वसाधारण सभा आणि २० एप्रिल २०२६ रोजी पार पडलेली स्थायी समितीची सभा यांचे सविस्तर इतिवृत्त आणि ठराव पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत. यापुढील सर्व ठराव व इतिवृत्ते लोकप्रतिनिधी व नागरिकांना एका क्लिकवर ऑनलाईन पाहता येणार आहेत.

लोकप्रतिनिधी व नागरिकांनी https://mahaulb.in या संकेतस्थळावर जाऊन 'बीड' जिल्हा निवडावा, त्यानंतर 'परळी वैजनाथ नगर परिषद' निवडून 'सभा कामकाज' या विभागावर क्लिक करावे. तेथे नियम व अटी मान्य केल्यानंतर (I Agree) संबंधित तारखेचे ठराव सर्वसामान्यांना पाहण्यासाठी व अभ्यासासाठी उपलब्ध होतील.नगरपरिषदेने घेतलेले निर्णय, विविध विषयांवरील चर्चा आणि मंजूर झालेले ठराव आता एका क्लिकवर उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना प्रशासकीय घडामोडींची अचूक माहिती मिळणार आहे.या सुविधेचा सर्व नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी लाभ घ्यावा, असे आवाहन नगर परिषद परळी वैजनाथ च्या वतीने करण्यात आले आहे.

- **कसे पाहाल इतिवृत्त?**
- **१. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित https://mahaulb.in या संकेतस्थळावर जा.**
- **२. आपला जिल्हा आणि नगरपरिषद (ULB) निवडा.**
- **३. उजवीकडील मेनूमध्ये (तीन आडव्या रेषा) 'सभा कामकाज/ठराव' विभागात जा.**
- **४. अटी मान्य (I Agree) केल्यानंतर ६ फेब्रुवारी आणि २० एप्रिल २०२६ च्या सभांचे इतिवृत्त डाऊनलोड करता येईल.**